महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

ठाणे येथील नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच कापूरबावडी, वर्तकनगर आणि वागळे इस्टेट परिसरात चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असल्याबाबत

(१) ४४५२३ (१७-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच कापूरबावडी, वर्तकनगर, आणि वागळे इस्टेट परिसरात माहे जानेवारी, २०१६ व त्यानंतर सातत्याने घरफोडी, चोऱ्या तसेच महिलांचे मंगळसूत्र व सोन्याच्या चेन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी असून असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त घटनांना पायबंद घालण्यासाठी पोलीस गस्त वाढवून ठिकठिकाणी पोलीस चौकी उभारण्याची स्वयंम स्वरुपी को.ऑ.हौ. सोसा, सिध्देश्वर तलाव समिती, शिवदर्शन का. ऑ.हौ. सोसा, चंदणवाडी, हरहर महादेव को. ऑ.हौ. सो. सुचेता को.ऑ.हौ.सो. मिताली को.ऑ.हौ. सो. मोना को, ऑ.हौ.सो. इत्यादी शेकडो रहिवाशांनी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१७) :(१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील नमूद परिसरातील घटना मोठ्या प्रमाणात घडलेल्या नाहीत. तथापि, सन २०१६ मध्ये घरफोडी, चैनस्नॅचिंग व चोरी प्रकरणी अनुक्रमे १३१, ७२ व ३९२ गुन्हे दाखल असून त्यापैकी अनुक्रमे ४१, ३९ व ५५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच, सन जून, २०१७ अखेर पर्यंत घरफोडी, चैनस्नॅचिंग व चोरी प्रकरणी अनुक्रमे ३९, ४१ व २५३ गुन्हे दाखल असून त्यापैकी अनुक्रमे ०९, १३ व ५७ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. त्यामुळे नागरीकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदरबाबत, रुपादेवी महिला मंडळ चंदनवाडी ठाणे यांचेकडून चौकी उभारण्याची अर्ज प्राप्त असून सदर चौकीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याकरीता आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(३) घरफोडी, चैनस्नॅचिंग व चोरी यासारख्या गुन्ह्यांना आळा/ पायबंद घालण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याचे हद्दीत दिवसा व रात्रौपाळी गस्त वाढविण्यात आलेली असून दिवसा व रात्री बिट मार्शल नेमण्यात येतात. तसेच, गुन्हे प्रकटीकरण कक्षातील साध्या वेशातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हद्दीतील पेट्रोलिंग करीत असतात. पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकठिकाणी अचानकपणे नाकाबंदी लावण्यात येत असून कोम्बींग ऑपरेशन करण्यात येते, त्याचप्रमाणे पिटर मोबाईल व बिटमार्शलचे कर्मचारी, हद्दीतील बँका, ज्वेलर्स, दुकाने यांना भेटी देत असतात.

सदर दाखल गुन्ह्यांचा तपास करून गुन्ह्यातील आरोपींना शोधण्याचे कसोशीने प्रयत्न केले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दादर रेल्वे स्टेशन (पुर्व), मुंबई येथे गेल्या काही वर्षापासून ब्ल्यू गँग टॅक्सी चालक प्रवाशांची आर्थिक फसवणूक करीत असल्याबाबत

(२) ६४५९५ (२४-०८-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर रेल्वे स्टेशन (पुर्व), मुंबई येथे गेत काही वर्षापासून ब्ल्यू गँग टॅक्सी चालक करीत असलेल्या प्रवाशांच्या आर्थिक फसवणूकी विरोधात नॅशनल जर्नालिस्ट वेल्फेअर असोसिएशन तर्फे मा.मंत्री (परिवहन), पोलीस आयुक्त (मुंबई) इत्यादी कडे माहे जून २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवदेनाद्वारे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्ल्यू गँग टॅक्सी चालक वाहनामध्ये ब्ल्यू लाईट चालू करुन प्रवाशांनी दिलेली नोट बदलतात व प्रवाशांची आर्थिक फसवणूक केली जाते,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीअंती प्रवाशांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या ब्ल्यू गँग टॅक्सी चालकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१७) :(१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) सदर बाबत माटुंगा पोलीस ठाणेकडून सन २०१५ ते सन २०१६ पर्यंत ६ गुन्हे दाखल असून ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच अटक आरोपींवर सहाय्यक पोलीस आयुक्त तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, माटुंगा विभाग मुंबई, यांचेमार्फत फौ.द.प्र.सं कलम ११० अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून आरोपींवर मा.महानगर न्यायदंडाधिकारी ६१ वे न्यायालय कुर्ला, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या घटनांना आळा बसविण्याकरिता टॅक्सी स्टँड आणि रेल्वे प्लॅटफॉर्मवर उद्घोषणा करण्यात येते. सध्या अशा प्रकारे प्रवाशांची फसवणूक होत नाही. अशा घटनांना आळा बसला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यभरातील कारागृहात कैद्यांना आवश्यक असणा-या साधनांचा निकृष्ट पुरवठा केल्याप्रकरणी कंपन्यांवर केलेली कारवाई

(३) ६५१२३ (११-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील कारागृहात कैद्यांना आवश्यक असणाऱ्या साधनांचा निकृष्ट पुरवठा केल्याप्रकरणी ८ मोठ्या कंपन्यांना त्यांच्या दोषाच्या गांभिर्यानुसार २० वर्षे तुरुंगाच्या खरेदी/निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास बंदी घालून काळ्या यादीत समाविष्ट केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कारागृहात कैद्यांना आवश्यक असणाऱ्या साधनांची खरेदी करत असताना पुन्हा असे प्रकार घडू नयेत म्हणून सदर कंपन्यावर कोणती कारवाई केली तसेच खरेदी/ निविदा प्रक्रियेत कोणत्या सुधारणा करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) तुरुंग निर्मित वस्तुच्या उत्पादनाकरिता आवश्यक असणाऱ्या साधनांची खरेदी करत असताना परत असे प्रकार भविष्यात घडू नयेत म्हणून या कंपन्यावर कार्यवाही करण्यात आली आहे.

१. "सर्व विभांगाकडून बंदी घालणे" अंतर्गत निविदाकाराच्या संस्थेचे नाव मान्यताप्राप्त केंद्रीय भांडार खरेदी संघटना (CSPO)यादीतून वगळणे तसेच त्यांना कायमस्वरुपी प्रतिबंधित करणेकरिता प्रस्ताव उद्योग विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

२. कारागृह विभागास पुरवठा करण्यापासून प्रतिबंध करण्यात आला आहे.

३. निविदेकरिता जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे.

४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क.८२/भाग III/ उद्योग-४, दि. ०१.१२.२०१६, नुसार काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे.

५. निविदाकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील उत्तर जरिपटका परिसरात 'मणप्पुरम गोल्ड' या संस्थेतून सोने लुटण्यात आल्याबाबत

(४) ६५२०० (११-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील उत्तर भागात जरिपटका परिसरात वारंवार मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत असून दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मणप्पुरम गोल्ड या संस्थेतून ३१ किलो सोने भरदिवसात लुटण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील उत्तर विभागातील जरिपटका परिसरात वारंवार मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत नाहीत मात्र, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी मणप्पुरम गोल्ड या संस्थेतून ३१ किलो सोने लुटण्यात आले आहे. हे खरे आहे,

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन जरीपटका येथे अपराध क्र. ५७६/२०१६ कलम ३९५, ३९७, ३४२ भादवि. सहकलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा चा गुन्हा दिनांक २८.०९.२०१६ रोजी दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्याचा सखोल तपास सुरु असून गुन्हा लवकरात लवकर उघडकिस आणून चोरीस गेलेला मुद्देमाल मिळून यावा या करीता सर्वतोपरी प्रयत्न चालु आहे. सध्या गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जुजारपूर (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथील १२ वर्षाच्या मुलीच्या खुनाचा तपास होण्यासाठी लोणारी समाजाने काढलेला मोर्चा

(५) ६५५२५ (१७-०१-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुजारपूर (ता.सांगोले, जि.सोलापूर) येथे १२ वर्षाच्या मुलीचा दिनांक २४ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास केलेल्या अमानुष खुनाची चौकशी करून गुन्हेगार शोधून काढण्यात यावेत, मृताच्या वारसांना आर्थिक मदत करावी, खटला चालविण्यासाठी चांगले वकील नेमावेत या व अन्य मागण्यासाठी दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास हजारोंच्या संख्येने लोणारी समाजाने मोर्चा काढून तहसिलदार, सांगोले यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन सांगोला येथे गु.र.नं.२६४/२०१४ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ३७६ बाललैंगिक अत्याचार संरक्षण प्रतिबंधक कायदा सन २०१२ चे कलम ८ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी एक आरोपी निष्पन्न झाला असून त्याला अटक करून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर खटला सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आमला (जि.बीड) सिरसाळा शिवारात येथील पांचाळ समाजाच्या कुटूंबावर सोळंके समुदायाने हल्ला केल्याबाबत

(६) ६५५७१ (१७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.आमला (ता.धारुर, जि.बीड) येथील सिरसाळा शिवारात पांचाळ या सुतार समाजाच्या कुटूंबावर सोळंके समुदायाने दिनांक २४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास हल्ला करुन आठ महिन्यांच्या मुलीला नाल्यात कोंबल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सिरसाळा पोलिस स्थानकांत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) तसेच सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांना विश्वकर्मा विराट संघ, जि.बीड यांनी लेखी निवेदनही दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणातील आरोपीवर शासनाने कारवाई करण्याबाबत तसेच अशा घटना घडू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१७) :(१) हल्ला केला हे खरे आहे, परंतू आठ महिन्याच्या मुलीला नाल्यात कोंबल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(२) सदर प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६७/१६ भादवि कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४, १४३, १४७, १४८, १४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी ९ व्यक्तींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध सीआरपीसी कलम १०७ अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही

पाटण मतदार संघातील पोलीस पाटलाची रिक्त पदे भरण्याबाबत

(७) ६६१५६ (१७-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याने डोंगरी तालुक्यातील जनतेला अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटण तालुक्याच्या शेजारील कराड तालुक्यात पाच महिन्यापूर्वी पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्यात आली असून त्याच धर्तीवर पाटण मतदार संघातील सदर पदे भरण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करण्यासंदर्भात सूचना कराव्यात अशी मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमरास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पोलीस पाटलांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :(१) उपविभागीय कार्यालय, पाटण अंतर्गत ३२५ पोलीस पाटील पदे मंजूर असून त्यापैकी ३५ पदे कार्यरत आहेत तर २९० पदे रिक्त आहेत.
(२) कराड तालुक्याच्या धर्तीवर पाटण मतदारसंघातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी यांना तात्काळ सुरु करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दिनांक २९.०८.२०१६ रोजी मागणी करण्यांत आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी, सातारा यांना आवश्यक त्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत.
(३) जिल्ह्यामध्ये नगरपालिका निवडणूक व त्यानंतर जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणूकीची आचारसंहिता सुरु झाल्याने सदरची रिक्त पदे भरता आली नाहीत. सदरची रिक्त पदे भरण्यासंदर्भात संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी उपविभागीय दंडाधिकारी, पाटण यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरामध्ये घरफोड्या, सोनसाखळी, मोबाईल, बाईक तसेच इतर चोऱ्या करणाऱ्या गुन्हेगारांचे प्रमाण वाढले असल्याबाबत

(८) ७२५२८ (११-०१-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरामध्ये घरफोड्या, सोनसाखळी, मोबाईल, बाईक तसेच इतर चोऱ्या करणारे गुन्हेगारांचे प्रमाण वाढले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस विभागात तक्रार नोंदविल्या जात असूनही गुन्हा दाखल करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार चोऱ्यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) अकोला जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये मालमत्ते संदर्भात दाखल गुन्ह्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

शिर्षक	दाखल	उघड	अटक आरोपी	गेला माल	मिळाले माल
घर फोडी	१४	०५	०७	६,०२,८१७	९३,५००
मोबाईल	१०	००	००	१,५९,०२५	००
मोटार सायकल	१७	१०	१९	४,११,०००	२,१४,०००
इतर चोरी	२३	११	०९	१३,३४,२७५	३,७३,९००
एकूण	६४	२६	३५	२५,०७,११७	६,८१,४००

(२) हे खरे नाही.

पोलीस विभागास मालमत्ता चोरी प्रकरणी तक्रारदाराकडून तक्रारी प्राप्त होताच तात्काळ गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून गुन्ह्यांचा तपास करण्यात आलेला आहे.

(३) माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये तक्रारदार यांचे कडून मालमत्ता चोरी गेल्या संदर्भात तक्रार प्राप्त होताच नमुद प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हे नोंद करण्यात आले असून, गुन्हेगारांचा शोध घेवून दाखल ६४ गुन्ह्यांपैकी एकूण २६ गुन्हे उघडीस आणून सदर गुन्ह्यांमध्ये एकूण ३५ मालमत्तेचे गुन्हे करणारे आरोपी यांना अटक करुन त्यांचे कडून एकूण ६,८१,४००/- रु. किंमतीची मालमत्ता हस्तगत करुन त्यांचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. उघडकीस न आलेल्या गुन्ह्यांचा तपास सुरु असून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील तळेगाव एम.आय.डी.सी पोलीस ठाण्यात
कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

(९) ७२६१३ (१७-०१-२०१७). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील तळेगाव एम.आय.डी.सी पोलीस ठाण्याचे काम एक वर्षभरापूर्वी सुरु झाले असून ठाण्यात ४ अधिकाऱ्यांसह ४४ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून केवळ १ अधिकाऱ्यासह २३ कर्मचाऱ्यांवर ठाण्याचा कारभार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खून, बलात्कार, दरोडे, भांडणे, अपघात, लुटमारी, अज्ञात मृतदेह, अवैध धंदे, वाहतूक कोंडी इत्यादी घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकाच वेळी अनेक गुन्हे व अपघात घडल्यास अधिकारी व कर्मचारी यांच्यावर मोठ्या प्रमाणावर कामाचा व्याप येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) :(१) हे खरे नाही.

पुणे ग्रामीण जिल्हा कार्यक्षेत्रातील तळेगाव एम.आ.डी. पोलीस ठाणे हे माहे ऑगस्ट २०१५ पासून नव्याने स्थापन करण्यात आलेले आहे. सदर पोलीस स्टेशन येथे ६८ पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची पदे मंजूर असून, सध्या तेथे ३ अधिकारी व ४० पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) सदर हद्दीत गुन्हयांची संख्या जास्त असल्यामुळे सदर ठिकाणी नव्याने पोलीस ठाणे निर्माण आले असून अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

एकाच वेळी गुन्हे वा अपघात घडल्यास राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या तैनात करण्यात येतात. तसेच जवळच्या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची मदत घेतली जाते.

(४) पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलात सन २०१६ मध्ये भरती झालेले एकूण ९२ कर्मचारी हे सध्या पोलीस शिपाई पदाचे मुलभुत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदरचे प्रशिक्षण पूर्ण होताच तळेगाव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात येतील.

(५) प्रश्न उदभवत नाही.

नवी मुंबई येथील उलवे सेक्टर-१८ मधील भूखंड मिळवून देण्याचे
आश्वासन देऊन ८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

(१०) ७४०६० (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील उलवे सेक्टर-१८ मधील भूखंड मिळवून देण्याचे आश्वासन देऊन मुंबईतील एका सोसायटीच्या प्रवर्तकाकडून एकूण रुपये ८ कोटींची फसवणूक करणाऱ्या दोन इस्टेट एजंटना आर्थिक गुन्हे शाखेच्या युनिट-२ ने दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोपींवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे,
(२) सदर प्रकरणी ३ आरोपी विरुध्द न्हावाशेवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९८/१६ भा.द.वि.सं.क. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ अन्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हेशाखा कक्ष-२ यांचेकडे आहे. आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोरीवली ते एनसीपीए दरम्यान सागरी वाहतुक सुरु करण्याबाबत

(११) ७६०३९ (१२-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली ते एनसीपीए दरम्यान सागरी मार्गाकरिता महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने तयार केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सागरी वाहतुक सुरु करण्यासाठी शासनाने दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमरास निविदा मागविल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरूप काय आहे व त्यास किती खर्च येणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर सागरी वाहतुकीसाठी निधीची तरतुद कशा प्रकारे करण्यात येणार आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत सुरु होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) : (१) नाही.

मेसर्स एसएसआर मरीन सर्व्हिसेस प्रा.लि. कंपनीला मेरीटाईम बोर्डाकडून बांद्रा ते एनसीपीए या जलमार्गात प्रायोगिक तत्वावर दिनांक २५.०५.२०१८ (दिनांक २६.०५.२०१७ ते दिनांक ३१.०८.२०१७ पावसाळी हंगाम वगळून) पर्यन्त प्रवासी वाहतूक करण्यास दिनांक १८.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे. परंतू एनसीपीए (मुंबई) या ठिकाणी फ्लोटींग जेट्टीच्या बांधकामास आवश्यक असलेल्या जागेसाठी महसूल व वन विभागाकडून परवानगी न मिळाल्यामुळे सदरची प्रवासी वाहतूक सुरु होऊ शकलेली नाही.

(२) व (३) एनसीपीए येथे फ्लोटींग जेट्टीचे बांधकाम करणे व सदर मार्गातून वाहतूक सुरु करणे यासाठी येणारा खर्च कंपनी स्वतः करणार असल्याने खर्च येण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. तसेच सदरची वाहतूक प्रायोगिक तत्तावर एनसीपीए ते बांद्रा या जलमार्गावर चालविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील सुमारे ३०० गुंतवणूकदारांची फडणीस इन्फ्रास्ट्रक्चरने कोट्यवधी रुपयांची केलेली फसवणुक

(१२) ७७१०५ (२१-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील फडणीस इन्फ्रास्ट्रक्चरने सुमारे ३०० गुंतवणूकदारांची १२.५० टक्के व्याजदराच्या आमिषाने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फसवणुकीबद्दल तक्रारदारांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१७) :(१), (२) व (३) सदर प्रकरणी फडणीस ग्रुप ऑफ कंपनीने फिर्यादी यांची २,३०,०००/- रुपयांची फसवणूक केल्याबाबतची फिर्याद दिल्याने मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं.२६३/२०१६ भा.दं.वि. कलम १२०(ब), ४२०, ४०६, ४०९ सह एमपीआयडी कायदा १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये दिनांक ३०/०९/२०१६ रोजी गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी विनय प्रभाकर फडणीस यास दि.२०/०४/२०१७ रोजी अटक केली आहे. तपासात सदर कंपनीचे रजिस्टार यांचेकडुन संचालकाची यादी, कंपनीचे फायनान्शियल स्टेटमेन्ट, ठेवीदारांची यादी इ. दस्तावेज प्राप्त करणेसाठी पत्रव्यवहार करण्यात आला असून माहिती प्राप्त होणे बाकी आहे. तसेच, आरोपीतांचे व कंपन्यांचे बँक खाते गोठविण्यात आले असून बँकाकडुन गोठविण्यात आलेल्या बँक खात्याचे विवरण व दुय्यम निबंधकाकडुन आरोपींच्या व कंपनीच्या मालमत्तेबाबत माहीती प्राप्त करुन एम.पी.आय.डी. कायदान्वये मालमत्ता जप्त करण्याची तजबीज ठेवली आहे. तसेच, गुन्ह्यांतील फरार आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

मुंबई-नागपूर समृद्ध महामार्गाला विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याबाबत

(१३) ७७५१३ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाला संघर्ष समितीच्या शेतक-यांकडून विरोध करणा-या ठाणे, शहापूर तालुक्यामधील शेतकरी व कार्यकर्त्यांवर पोलीसांनी गुन्हे दाखल करून दहशत निर्माण केल्याने ग्रामीण परिसरात भितीचे वातावरण पसरल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन शासनाने सदर शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यास निश्चित किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१७) :(१) व (२) सदर प्रकरणी ठाणे ग्रामीण जिल्ह्यात एकुण ३ गुन्हे दाखल आहेत. अ) शहापूर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २६/१७ भादवि कलम ३५३,१४३,१४४,१४७,४४७,५०६,५०४ प्रमाणे गुन्हा दाखल. ब) पडघा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६९/१७ भादवि कलम ३५३,१४३,३४१,३५२ मुंबई पोलीस कायदा १९५१ कलम १३५ तसेच मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल. क) कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११२/१७ भादवि कलम ३५३, ३३२, १४३, १४७, १४८, १४९, ११४, ३३६, ५०६ सह मुंबई पोलीस कायदा ३७(१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर तीनही गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंगरुळ (ता.घनसांगवी, जि.जालना) येथे गावातील जातीयवाद्यांनी भारिप-बहूजन महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष व त्यांच्या भावाला जबर मारहाण केल्याबाबत

(१४) ७७९३० (२१-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ (ता.घनसांगवी, जि.जालना) ग्रामपंचायतीने सन २००० ते २००५ या कालावधीत केलेल्या दलितवस्ती विकास कामाची माहिती मागीतल्यामुळे भारिप-बहूजन महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष श्री.सुधीर शरणागत व त्यांच्या भावाला गावातील जातीयवाद्यांनी जबर मारहाण केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक यांनी सदर गावातील जातीयवाद्यांवर कारवाई न करता उलट श्री.शरणागत यांच्यावरच दरोडा व हाफ मर्डरचे खोटे गुन्हे दाखल करुन त्यांना अटक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील जातीयवाद्यांनी शरणागत कुटूंबातील महिलांचा विनयभंग करुन त्यांना मारहाण केल्याची तक्रार शरणागत कुटुंबियांनी गोंदी पोलीस स्टेशनमध्ये केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन सदर जातीयवाद्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१७) :(१) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गोंदी येथे अदखलपात्र गुन्हा क्र. ५३०/२०१६ भादवि कलम ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) नाही, हे खरे नाही. सदर प्रकरणी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे गोंदी येथे गु.र.क्र. ३७९/२०१६ भादवि कलम ३०७, ३९४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोन व्यक्तींना अटक करण्यात आली होती. सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत.
(३) सदर प्रकरणी पोलीस ठाणे गोंदी येथे गु. र. क्र. १३/२०१७ भादवि कलम ३५४ (अ), १४३, १४७, १४९, ३२३, ५०४ सह कलम ३(१) (११), ३(१) (W) अजाजअप्रका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) वरील नमुद गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील हुडकेश्वर, कर्नलबाग, रेशिमबाग, सक्करदरा, अजनी, मानेवाडा, न्यु सुभेदार, आर्शिवाद या परिसरात मनोविकृत खुन्याने महिलांना जखमी केल्याबाबत

(१५) ७९८१८ (२१-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील हुडकेश्वर, कर्नलबाग, रेशिमबाग, सक्करदरा, अजनी, मानेवाडा, न्यु सुभेदार, आर्शिवाद या परिसरात मनोविकृत खुनीने सहा महिला व मुलीवर चाकूने हमला करुन गंभीर जखमी केले असल्याने सदर परिसरात मनोविकृत खुनीची दहशत निर्माण झाली असून महिला व मुलींना घरा बाहेर निघणेही मुश्किल झाले असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनोविकृत खुनीच्या दहशतीमुळे हजारो महिलांनी सक्करदरा पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून तातडीने मनोविकृत खुनीला पकडण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील पोलीस ठाण्यातील पोलीस व अधिकारी हे विना हेल्मेट धारकांना पकडण्यासाठी अनेक ठिकाणी उभे राहत असल्याने पोलीस स्टेशन हद्दीत घडत असलेल्या गंभीर गुन्हाच्यावेळी पोलीस ठाण्यात पोलीस हजर राहत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाची चौकशी करुन मनोविकृत खुनीला पकडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) अनोळखी आरोपीने ६ महिला व मुलींवर चाकूने हमला करुन गंभीर जखमी केल्याबाबत पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन सक्करदरा येथे ४ तसेच अजनी व हूडकेश्वर पोलीस स्टेशन येथे प्रत्येकी १ गुन्हा असे एकूण ६ गुन्हे माहे जानेवारी, २०१७ मध्ये दाखल करण्यात आले आहेत.
(२) अनोळखी आरोपीच्या दहशतीमुळे त्यास पोलीसांनी अटक करण्यात यावी या मागणी करीता अंदाजे शंभर ते दिडशे महिला व पुरुष पोलीस स्टेशन सक्करदरा येथे जमा झाले होते व आरोपीला अटक करण्याची मागणी केली होती.
(३) हे खरे नाही.

अनोळखी आरोपीला पकडण्यासाठी नागपूर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन स्तरावर अधिकारी व महिला कर्मचारी यांना नेमण्यात आले असून पोलीस स्टेशन हद्दीत सतत नाकाबंदी व पेट्रोलिंग लावण्यात आलेली आहे.पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी हे विनाहेल्मेट धारकाना पकडण्यासाठी अनेक ठिकाणी उभे राहत असल्याची ही बाब चुकीची आहे.
(४) अनोळखी आरोपीस पकडण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर अधिकारी तसेच महिला कर्मचारी हे पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये सतत पेट्रोलींग करीत असून नाकाबंदी सुध्दा लावण्यात आलेली आहे. नागरीकांमध्ये जागृता निर्माण होण्याकरीता त्यांचे मिटींग घेण्यात आलेल्या असून वरिष्ठ पातळीवर याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात दारू बंदी असतानाही जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरात दारू विक्री सुरू असल्याबाबत

(१६) ८०१६३ (२१-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात दारू बंदी असतानाही जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरातील दुकानात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान गाईन नावाच्या दारू विक्रेत्या महिलेकडून मोठ्या प्रमाणात दारू जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेकडून पोलिसांना मोठ्या प्रमाणात हप्ता दिला जात असल्यामुळे तिच्यावर अद्याप गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त घटनास्थळापासून १५ कि.मीवर असणाऱ्या येवली येथे चौधरी नावाच्या महिलेविरुध्दही गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याबाबत तसेच दारू विक्रीला प्रोत्साहन देणाऱ्या गडचिरोलीच्या पोलिस उपविभागीय अधिकाऱ्याला निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) गाईन नावाची महिला जि.गडचिरोली येथे राहणार असून तिचे दुकान पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर किंवा सदर परिसरात नसून जिल्हापरिषद कार्यालया समोर आहे.सदर महिले विरुध्द माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये दारुबंदी सदराखाली गुन्ह्याची नोंद नाही परंतु माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये अप.क्र. ६१६४/२०१६ व माहे नोव्हेंबर,२०१६ मध्ये ६२५६/२०१६ नुसार गुन्हे नोंद असून एकूण १८५०/- रुपये किंमतीचा प्रो. व्ही. चा माल जप्त करुन नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

नमुद गुन्ह्यामध्ये वेळीच अटक करुन मा.न्यायालयात समक्ष हजर करण्यात आले आहे.

(३) व (४) चौधरी नावाच्या महिले विरुध्द गडचिरोली जिल्ह्यात महा.दा.का. सदराखाली १७ गुन्हे दाखल आहेत. सदर महिला सराईत गुन्हेगार असून महा. दा.का.कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच दिनांक २८.०८.२०१६ रोजी बंधपत्र घेण्यात आले असून महा. पोलीस कायदा १९५१ कलम ५६ प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय व जिल्हा सत्र न्यायालय कायमस्वरुपी सुरु होण्याबाबत

(१७) ८०३७२ (२१-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्याकरिता सन २०१३-२०१४ च्या दरसूचीवर आधारित प्रशासकीय मान्यतेकरिता ४४ कोटी ५५ लक्ष रुपयांच्या किंमतीचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) यांनी पत्र क्र.मुंअ(मुं)/का-२(१)/४५६० दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ नूसार पाठविल्याचे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प, सा.बां. ठाणे विभाग यांनी जा.क्र. विप्रवि/सा.बां./प्रशा-१/२६३ दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्यातील न्यायालयाच्या दुरवस्थेमुळे नविन इमारतीच्या बांधकामाबाबत भिवंडी वकिल संघटनेकडून व लोकप्रतिनिधींकडून अनेक वर्षापासून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भिवंडी येथील न्यायालयीन इमारतींचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१७) :(१) होय, अंशत: खरे आहे.

भिवंडी, जि.ठाणे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत सन २०१४-१५ च्या दरसूचीवर आधारित प्रशासकीय मान्यतेकरीता रु.४४ कोटी ५५ लाख एवढ्या किंमतीचे अंदाजपत्रक मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि.२९ ऑक्टोबर, २०१४ नुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांना पाठविले व सदर अंदाजपत्रके मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत शासनास प्राप्त झाले.
(२) होय. अंशत: खरे आहे.

भिवंडी येथील नवीन न्यायालयीन इमारत याबाबत भिवंडी वकील संघटना व लोकप्रतिनिधींकडून सन २०१७ मध्ये मागणी झालेली आहे.
(३) भिवंडी, जि.ठाणे येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सीसीबी-१११५/ प्र.क्र. १६४/ का.१३, दि. ०२ जून, २०१७ अन्वये रु.३८,१५,७०,०००/- इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच, जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात सदर न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासाठी निधि उपलब्धतेसाठी तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रलंबित खटल्यांचा तातडीने निपटारा होण्याबाबत

(१८) ८४८०७ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशभरात न्याय प्रविष्ठ खटल्यांची परिस्थिती बिकट असून एकूण ३ कोटी खटले न्यायाच्या प्रतिक्षेत असून त्यामध्ये महाराष्ट्र दुस-या क्रमांकावर असल्याचा अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयाने प्रसिध्द केलेल्या 'इंडियन ज्युडीशीयरी ॲन्युअल रिपोर्ट सन २०१५-१६ आणि सब ऑर्डिनेट कोर्ट्स ऑफ इंडिया अ रिपोर्ट ऑन ॲक्सेस टू जस्टीस २०१६' या अहवालात नमूद करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात किती खटले प्रलंबित आहेत व प्रलंबित असलेले खटले हे कोणत्या श्रेणी निहाय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील खटले निकाली निघावेत यासाठी राज्यातील तालुका, जिल्हा, मा.उच्च न्यायालय यामध्ये रिक्त असलेली न्यायाधिशांची व सरकारी वकिलांची पदे भरण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने प्रसिद्ध केलेल्या "सब ऑर्डिनेट कोर्टस ऑफ इंडिया अ रिपोर्ट ऑन ॲक्सेस टू जस्टीस" या मध्ये देशातील दुय्यम न्यायालयामध्ये सन २०१५ मध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या २,७१,७६,०२९ इतकी असून प्रलंबित खटल्यांच्या संख्यानुसार महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.
(२) उच्च न्यायालय मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठे येथील दिवाणी व फौजदारी श्रेणीतील अनुक्रमे २,११,३२० व ५२,३७९ अशी एकूण २,६३,६९९ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. तर राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये दिवाणी व फौजदारी श्रेणीमध्ये अनुक्रमे ११,४१,९१७ व २२,५१,७१६ अशी एकूण ३३,९३,६३३ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(३) उच्च न्यायालयातील मा. न्यायमुर्तीची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून अपेक्षित असून जिल्हा व तालुका न्यायालयांतील जिल्हा न्यायाधीश, फास्ट ट्रॅक कोर्टचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, वरिष्ठ-कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश इ. विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याची विहित प्रक्रिया उच्च न्यायालय, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व शासनस्तरावरून सुरू आहे. राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालये तसेच उच्च न्यायालय येथील विधि अधिकारी संवर्गातील सर्व पदे विहित निवड प्रक्रिया राबवून भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल जनतेस उपलब्ध करून देण्याबाबत

(१९) ८४८१८ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरकारच्या अधिपत्याखालील प्राधिकरणांमध्ये काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा गोपनीय अहवाल सर्वसामान्यांच्या हातात देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व प्रत्यक्ष अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :(१) व (२) नाही. तथापि, श्री.तानाजी शंकर थोरवे, वेणगाव, ता.कर्जत, जिल्हा रायगड यांचे माहिती अधिकारातील व्दितीय अपील निकाली काढताना क्र.केआर-४५२८/२०१५ मध्ये "प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अभ्यांगतांना

अभिप्रायासाठी फॉर्म ठेवण्यात यावेत, सदर फॉर्म ई-मेल व्दारे सेवा पुरविणाऱ्या नोडल प्राधिकरण/पर्यवेक्षकाकडेही पाठविण्यात येतील. सदर अभिप्रायाचे फॉर्म प्रत्येक तिमाहीला संबंधीत अधिकाऱ्यासमोर उघड करण्यात यावेत आणि सदर अधिकाऱ्याची जनतेबरोबरची वागणूकीबाबत वार्षिक गोपनीय अहवालात मुल्यमापन करण्यासाठी वापरण्यात यावेत असे निदेश माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(क) अन्वये मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांनी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना दि.२४.८.२०१६ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निदेशानुषंगाने क्र.संकिर्ण २०१६/ प्र.क्र.(२०४/१६) दि.२३.११.२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोनेगाव (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथे जनावरांना कत्तलखान्याकडे घेऊन जाणारा ट्रक पोलिसांनी पकडल्याबाबत

(२०) ८५२३४ (०४-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनेगाव (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील नान्नज-सोनेगाव रस्त्यावरील खैरी नदीच्या पुलावर जनावरांना कत्तलखान्याकडे घेऊन जाणारा ट्रक (क्र.एमएचडब्ल्यु १२१) शिव प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने पोलिसांनी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ट्रक, चालक व दोषी असणाऱ्या व्यक्तींना पोलिसांनी अटक व गुन्हा दाखल करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे. परंतू ती जनावरे कत्तलखान्याकडे घेऊन चालले होते हे निष्पन्न झाले नाही.

(२) सदर प्रकरणाबाबत पोलीस स्टेशन, जामखेड येथे गु.र. नं. ॥ १८/२०१७ अन्वये भा.दं.वि. कलम २७९ सह भारताचा प्राणी निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९९५ अन्वये कलम ५ (ब) ९, मो.वा. का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथील अस्थायी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

(२१) ८५४६३ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे गत अनेक वर्षांपासून अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या सुमारे १२९ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबतची मागणी दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदरहू मंदिर न्यासातील अस्थायी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(२२) ८६०४१ (१६-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय कर्मचा-यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने मुख्य सचिवांच्या समवेत मंत्रालयात दिनांक २४ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत कोणकोणत्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१), (२) व (३) मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत कास्ट्राईब महासंघाच्या वतीने मा. मुख्य सचिवांच्या समवेत दि.२० मे, २०१७ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या प्रश्नोत्तरांच्या चर्चा व घेतलेल्या निर्णयांची माहिती खालीलप्रमाणे :-

संघटनेचे मुद्दे	बैठकीत देण्यात आलेली माहिती	बैठकीत घेण्यात आलेला निर्णय
दि. ३१.१२.२०१७ पर्यंत सरळसेवामधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरण्यात यावा तसेच अनुशेष न भरणाऱ्या अधिकाऱ्यांवर	अनुशेषाची माहिती मागासवर्ग कक्षाकडे उपलब्ध नसल्याने याप्रकरणी मा.मुख्यसचिव यांनी नाराजी व्यक्त करुन याप्रकरणी अनुशेषाची माहिती	प्रशासकीय विभागाकडून या प्रकरणी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची माहिती संकलित करुन एकत्रित माहिती या विभागास सादर

दि. ५.११.२००९ च्या शा.नि.नुसार कार्यवाही करण्यात यावी.	सर्व विभागांकडून त्वरीत उपलब्ध करुन घेण्यात यावी. शालेय शिक्षण विभागामार्फत प्रामुख्याने पुणे विभागातील शिक्षक वर्गाचे मूळ नियुक्तीबाबत कागदपत्र उपलब्ध नसल्याने याप्रकरणे बिंदूनामावली तपासणी करणे शक्य नाही असे मा. सचिव ग्रामविकास यांनी निदर्शनास आणून दिले	करणे अपेक्षित आहे (सादर करण्यात आलेल्या माहितीत विभागाच्या अधिपत्त्याखालील सर्व कार्यालयांचा समावेश आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने देण्यात यावे) शिक्षक संवर्गाकरिता सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे शिक्षकांचा संवर्ग निश्चित करण्यात यावा. तसेच याप्रकरणी ग्रामविकास व जलसंधारण विभागांने योग्य धोरण निश्चित करावे
दि. ३१.१२.२०१७ पर्यंत पदोन्नतीमधील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा अनुशेष भरण्यात यावा तसेच अनुशेष न भरणाऱ्या अधिकाऱ्यांवर दि. ५.११.२००९ च्या शा.नि.नुसार कार्यवाही करण्यात यावी.	-	अनुशेषाची पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यास संबंधीत सर्व विभागांना कळविण्यात यावे. कायदयातील तरतूदींचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायद्यातील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.
दि. ३ डिसेंबर, १९८० च्या शासन निर्णयानुसार महत्चाच्या जागी मागासवर्गीयांच्या नेमणूका करण्याबाबत	-	दि. ३ डिसेंबर, १९८० नुसार कार्यवाही करण्यासाठी सुधारित परिपत्रक काढावे
गोपनीय अहवाल खराब असल्याने १२ व २४ वर्षे कालबध्द पदोन्नतीमुळे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना होणारा त्रास दुर करणेबाबत	सा. प्र. वि. दि. ७.१.१९६१ च्या शा. नि. तरतूदीनुसार विशेष सहानुभूती दर्शवून मागासवर्गीयाय कर्मचाऱ्याची प्रतवारी उंचावण्याची तरतूद आहे यास्तव याप्रकरणी अधिकची कार्यवाही अपेक्षित नाही.	सर्व विभागांनी दि. ७.१.१९६१ च्या शा.नि. नुसार कार्यवाही करावी याबाबत सूचना पून्हा निर्गमित करण्यात याव्यात

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची कृषि पदवी कृषि विभागाने नाकारल्याने विद्यापीठ बंद करण्यात यावे.	या प्रकरणी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सविस्तर चौकशी करुन अहवाल मा.मुख्यसचिव यांना सादर करणे आवश्यक आहे	मा. मुख्यसचिवांनी दिलेल्या निर्देशानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाने कार्यवाही करावी
निलंबित कर्मचाऱ्यांना विना विलंब कामावर रुजू करण्यात यावे.	प्रस्तुत प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाव्यतिरिक्त इतर नियम ८ व १० अन्वये करण्यात आलेल्या निलंबना प्रकरणी आढावा घेवून एक वर्षाच्या आत निकाली काढण्यात यावीत.	म.ना.से. नियम ८ व १० अन्वये सुरु असलेली विभागीय चौकशीची प्रकरणे एक वर्षाच्या आत निकाली काढण्यात येवून याबाबतचा वार्षिक अहवाल सादर करण्यात यावा.
श्री.प्रफुल्ल मैसकर, गटविकास अधिकारी, चाळीसगाव यांना श्री. आस्तीकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना अधिकार नसतांना निलंबित केले. तरी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या श्री. आस्तीकुमार या अधिकाऱ्यास निलंबित करुन श्री. म्हैसकर यांचे निलंबन रद्द करावे.	प्रस्तुत प्रकरणी सचिव ग्रामविकास यांनी चौकशी करुन अहवाल मा. मुख्यसचिव यांना सादर करणे आवश्यक आहे.	या प्रकरणी सविस्तर चौकशी अहवाल मा.मुख्यसचिवांना सादर करण्यात यावा.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरातील अंबाबाई मंदिरातील सीसीटिव्ही कॅमेरे कालबाह्य असल्याबाबत

(२३) ८६३४९ (०४-०९-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील अंबाबाई मंदिरातील सीसीटिव्ही कॅमेरे जुन्या पध्दतीचे व कालबाह्य झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील अतिसंवेदनशील मंदिरामध्ये या मंदिराचा समावेश असल्याने या मंदिरात अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१७) :(१) हे खरे नाही.

कोल्हापूर शहरातील श्री करवीर निवासिनी (अंबाबाई) मंदिरातील कॅमेरे सन २००७ पासून टप्प्याटप्प्याने बसविण्यात आलेले आहेत.सदर कॅमेऱ्यामध्ये काही कॅमेरे हे ॲनालॉग पध्दतीचे व काही कॅमेरे एचडी पध्दतीचे आहेत. हे कॅमेरे सुस्थितीत असून याद्वारे मंदिरातील प्रत्येक परिसरातील हालचाली व्यवस्थित टिपल्या जात आहेत.

(२) सदर मंदिर देशातील अतिसंवेदनशील मंदिर असल्यामुळे सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी मंदिरातील सर्व कॅमेरे व इतर सुरक्षा विषयक आराखडा तयार करण्याकरीता सिक्युरिटी कन्सल्टंट नेमण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात एम्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये नोंदीत सुशिक्षित तरुणांची संख्या २५ लाखापेक्षा जास्त असल्याबाबत

(२४) ८६३७९ (०४-०९-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एम्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये नोंदीत सुशिक्षित तरुणांची संख्या २५ लाखांपेक्षा जास्त असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षित शेतमजूर, माथाडी कामगारांची संख्या सुमारे ५० लाखापेक्षा जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-११-२०१७) :(१) राज्यातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात सुशिक्षित उमेदवारांच्या नोंदणीपटानुसार जुलै, २०१७ अखेर ३४,४२,४८० उमेदवारांची नोंदणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

तथापि, राज्यातील विविध ३६ माथाडी मंडळांमध्ये सुमारे २,१०,००० इतके माथाडी कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

(३) सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण, ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका, बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार माहिती व मार्गदर्शन प्रशिक्षण केंद्र, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान इत्यादी योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालुंजा खुर्द (ता.राहुरी, जि.अहमदनगर) येथे प्रवरा नदी पात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा करणा-यांनी तलाठ्यास जबर मारहाण केल्याबाबत

(२५) ८६५८३ (०४-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालुंजा खुर्द (ता.राहुरी, जि.अहमदनगर) येथे प्रवरा नदी पात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा करणा-यांनी कामगार तलाठी बाळासाहेब वायखिंडे यांना बेशुध्द होईपर्यंत मारहाण केल्याचे दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार या बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या व संबंधित तलाठ्याला मारहाण करणाऱ्या दोषींना पोलिसांनी अटक करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर घटनेबाबत राहुरी पोलीस येथे गु.र.नं.१७८/२०१७, भा.दं.वि.कलम ३५३, ३३२, ३४१ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी ३ आरोपी निष्पन्न झाले असून या ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सध्या सर्व आरोपी जामीनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्याची चौकशी पूर्ण झाली असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याचे मुख्य माहिती आयुक्त श्री.रत्नाकर गायकवाड यांना औरंगाबाद येथील सुभेदारी विश्रामगृहात मारहाण केल्याबाबत

(२६) ८६६६६ (०४-०९-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे मुख्य माहिती आयुक्त श्री.रत्नाकर गायकवाड यांना दिनांक १७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद येथील सुभेदारी विश्रामगृहात लाथा-बुक्या आणि चपलांनी मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मारहाण करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर घटनेबाबत बेगमपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे गु.र.नं. ९४/२०१७ भा.दं.वि. कलम ३०७, १२०(ब), ३५३, ३३२, १४३, १४७, १४८, १४९, सह कलम १३५ म.पो. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ८ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यांना अटक करून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गडहिंग्लज शहरात (जि.कोल्हापूर) सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविण्याबाबत

(२७) ८७०४३ (२३-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज शहरात (जि.कोल्हापूर) सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-१०-२०१७) :(१) (२) व (३) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत गडहिंग्लज शहराकरिता सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सक्षम प्राधिकरणाकडे सादर केला असल्याचा अहवाल गडहिंग्लज नगरपरिषदेने सादर केला आहे.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

मुरबाड (जि.ठाणे) तहसिल कार्यालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन शेतकऱ्याने आत्महत्या केल्याबाबत.

(२८) ८८३९४ (०४-०९-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तहसिल कार्यालयाच्या इमारतीवरुन उडी मारुन दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास श्री.अशोक शंकर देतले या शेतक-याने आत्महत्या केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) सदर घटनेबाबत मुरबाड पोलीस ठाण्यात सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू क्र. १४/२०१७ दाखल करण्यात आले आहे. सदर अकस्मात मृत्यूची चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मे. जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट प्रा.लि. कंपनीने प्रकल्पबाधित मच्छीमारांना दिलेल्या नुकसान भरपाईची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत

(२९) ८८४०४ (०४-०९-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट प्रा.लि. कंपनीने प्रकल्पबाधित मच्छीमारांना दिलेल्या नुकसान भरपाई संदर्भात सविस्तर तपशील तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा असे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी रत्नागिरी व प्रादेशिक बंदर अधिकारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,रत्नागिरी यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी रत्नागिरी व प्रादेशिक बंदर अधिकारी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड रत्नागिरी या दोन्ही अधिका-यांनी अद्यापपर्यंत मच्छीमारांना बंदर विकासकाने दिलेल्या नुकसान भरपाईची कोणतीही माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करून दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित दोन्ही अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत व बंदर विकासकाने मच्छीमारांना दिलेल्या नुकसान भरपाईची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१७) :(१) होय.
(२) व (३) नाही.

मा.श्री.वैभव नाईक, विधानसभा सदस्य यांनी मागणी केल्यानुसार, मे.जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. या कंपनीने जयगड परिसरात असलेल्या गावांतील मच्छिमारांना उपलब्ध करुन दिलेल्या सुविधांबाबतची माहिती, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक २४.११.२०१६ च्या पत्रान्वये मा.विधानसभा सदस्यांना उपलब्ध करुन दिली होती. कंपनीने सुविधा दिलेल्या लाभार्थी मच्छिमारांची नावे, पत्ते, मोबाईल क्रमांक तसेच मच्छिमारांसाठी पुरविलेल्या सुविधांवर कंपनीने केलेल्या खर्चाची तपशीलवार माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कंपनीला आदेशित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हा सत्र आणि कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीशांची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३०) ८८४८२ (०४-०९-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा सत्र आणि कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीशांची तसेच कर्मचाऱ्यांची रिक्त पदे असल्याने राज्यभरात ३१ लाख ४४ हजार दावे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पक्षकारांना न्याय मिळण्यास वर्षानुवर्षे विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वकील संघटनेने तसेच जनतेनी शासनाकडे न्यायालयातील रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी सतत मागणी करुनही कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यायालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे तसेच सदर पदे भरण्यासंदर्भात अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१७) :(१) हे खरे नाही.

दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांची पदे पूर्णत: भरण्यात आलेली आहेत. कर्मचाऱ्यांची एकुण २३,७१९ पदे मंजूर असून त्यापैकी २१,५३९ पदे भरण्यात आली आहेत व २१८० पदे रिक्त आहेत.

३३.९४ लाख दावे प्रलंबित आहेत हे खरे आहे परंतु, न्यायाधीशांच्या रिक्त पदांमुळे सदर दावे प्रलंबित नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सद्य:स्थितीत दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांची पदे रिक्त नाहीत. न्यायाधीशांची रिक्त पदे मा. उच्च न्यायालयाच्या शिफारशीप्रमाणे दरवर्षी तात्काळ भरण्यात येतात.

दि. ६/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांची १७९ व कर्मचाऱ्यांची ७५१ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत.

लघुलेखक (निम्न श्रेणी), कनिष्ठ लिपीक व शिपाई/हमाल ही पदे भरण्याबाबतची 'Central On-line Recruitment Process' ही प्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर शहरातील (जि.ठाणे) वाढत्या लुटमार व हिसांचारांच्या घटनांबाबत

(३१) ८८५७२ (०४-०९-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) श्रीमती गुंजन कौर या महिलेस एका महिलेने दिशाभूल करून आडबाजूला नेऊन गळ्यातील सोनसाखळी खेचून व कात्रीने केस कापून लुटण्याची घटना १२ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे वृत्तपत्रांमधून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उल्हासनगर मधील स्कायवॉकवर मांडा येथील रहिवासी श्री मोहम्मद अब्दूल रहिम वारीसअली शेख या व्यक्तीस तिन तरूणांनी मारहाण करून जबर जखमी करून त्यांचेकडील मोबाईल व रोख रक्कम लुटून पळ काढल्याची घटना दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर शहरात उक्त प्रकाराच्या लुटमार व हिंसाचाराच्या घटना वाढत असून त्याची नोंद घेवून त्यावर अंकुश ठेवण्याबाबत पोलीस यंत्रणा व गृह विभागाकडून कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर येथे गु.र.क्र. ९५/२०१७ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद गुन्हा तपासावर आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १००/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, ३९७, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद गुन्ह्यातील ४ आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) परिमंडळ-४ उल्हासनगर अंतर्गत पोलीस ठाण्यांकडून सन ऑगस्ट, २०१६ अखेर जबरी चोरी व इतर चोरीच्या एकूण १११ घटना घडल्या असून त्यापैकी ६१ गुन्हे उघडकीस आले. त्यामध्ये एकूण १२६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच, ऑगस्ट, २०१७ अखेर जबरी चोरी व इतर चोरीच्या एकूण १२५ घटना घडल्या असून त्यापैकी ५५ गुन्हे उघडकीस आले. त्यामध्ये एकूण ९३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

चालु वर्षात एकूण २३ आरोपींवर सी.आर.पी.सी १०९ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असून ४ इसमांवर मु.पो.का. कलम ५७ अ (१) अन्वये हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अशा घटना ज्या भागात घडतात त्या भागात साध्या कपड्यातील पोलीस वॉच करण्याकरीता नेमण्यात आलेले आहेत. तसेच, उल्हासनगर मधील स्काय वॉकवर अशा प्रकारचे गुन्हे घडू नये म्हणून मध्यवर्ती पोलीस ठाणे व विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथील कर्मचारी रात्री कर्तव्यावर नेमलेले आहेत. तसेच, परिमंडळातील पोलीस ठाण्याच्या हद्दीत बीट मार्शल, पीसीआर-१, पीसीआर-२, पीटर-१, पीटर-२ मोबाईल यांची गस्त वाढविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यातील मुंबई हायवेवरील खवड्या डोंगराजवळ असलेल्या हॉटेल लालाजी येथे पोलिसांना मारहाण केल्याबाबत

(३२) ८८८५४ (०४-०९-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील मुंबई हायवेवरील खवड्या डोंगराजवळ असलेल्या हॉटेल लालाजी येथे सुरु असलेल्या अवैध दारुविक्रीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या ४ पोलीसांना या हॉटेलच्या मालकाने व त्यांच्या भावांनी जबर मारहाण केली असल्याचे माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-१०-२०१७) :(१) होय, सदर घटना दिनांक २४.१.२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) सदर घटनेबाबत पोलीस ठाणे एम. वाळुज येथे गु.र.नं.४७/२०१७ भा.दं.वि. कलम ३३२, ३५३, ५०४, ५०६, ३४ सह कलम ४ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा व सह कलम ६५ (ख) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी २ आरोपी निष्पन्न झाले असून त्यांना अटक करून त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर खटला सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोकण निवड मंडळाने शिल्प निदेशक (गिरणीकर विद्युत) पदावर निवड केलेल्या उमेदवारांना व्यवसाय शिक्षण विभागाने निम्न वेतन श्रेणी पदावर नेमणूका दिल्याबाबत

(३३) ८८९२६ (०४-०९-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण निवड मंडळाने शिल्प निदेशक (गिरणीकार विद्युत) पदावर निवड केलेल्या उमेदवारांना व्यवसाय शिक्षण विभागाने गिरणीकार व्यवस्थापन (विद्युत) या पदावर व निम्न वेतनश्रेणीवर नेमणूका करुन कोकण निवड मंडळाच्या निवड आदेशाविरुध्द निर्णय घेतल्याने याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चुकीच्या पध्दतीने नेमणूक आदेश दिल्याने कर्मचा-याचे प्रचंड नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चुकीच्या पध्दतीने दिलेल्या आदेशामुळे नुकसान झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्या पात्रतेनुसार सामावून घेण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-११-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

भूतपूर्व निवड मंडळ कोकण भवन, नवी मुंबई यांचेमार्फत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई विभागातील पदे भरण्यासाठी दिलेल्या जाहिरातीमध्ये पद क्रमांक २ शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) या पदाच्या ८ जागा व त्यासाठी रु १४००-२६०० वेतनश्रेणी दर्शविण्यांत आली होती. परंतु व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) अशा पदनामाची पदे अस्तित्वात नव्हती तर गिरणीकार व्यवस्थापन अशी पदे अस्तित्वात होती व त्यांची वेतनश्रेणी रु १४००-२३०० अशी आहे. सदर जाहिरातीनुसार शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) या पदावर ६ उमेदवारांची निवड करुन शिफारस केलेली होती.

त्यापैकी तत्कालीन उपसंचालकांच्या दिनांक १४.०३.१९९५ च्या आदेशानुसार सध्या ३ उमेदवार गिरणीकार व्यवस्थापन या पदावर कार्यरत असुन त्यांची वेतनश्रेणी रु १४००-२३०० अशी होती. निवड झालेल्या उमेदवारांनी गिरणीकार व्यवस्थापन पदावरील नियुक्तीच्या आदेशाच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे व आदेशामध्ये नमूद केलेल्या संस्थेमध्ये रुजु होण्याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडे प्रतिज्ञापत्र दिले होते. त्यानुसार संबंधित उमेदवार गिरणीकार व्यवस्थापन पदावर रुजु झाले आहेत. नियुक्तीच्या वेळी सदर उमेदवारांनी कोणताही आक्षेप घेतलेला नाही व स्वेच्छेने नियुक्ती स्विकारत असल्याबाबत हमीपत्र लिहून दिलेले आहे.

(३) व (४) गिरणीकार व्यवस्थापन या पदावर कार्यरत असलेल्या ३ कर्मचाऱ्यांना शिल्प निदेशक (विजतंत्री) या पदावर समायोजित करण्यांबाबतचा प्रस्ताव विभागामार्फत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर करण्यांत आला असता, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने सदरहु प्रस्ताव मान्य करता येत नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

नाशिक एमआयडीसी प्रादेशिक कार्यालयातून उद्योजकाने सादर केलेल्या नस्तीतील भूखंडाचे नकाशे गहाळ झाल्याबाबत

(३४) ८९०३९ (०४-०९-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक एमआयडीसी प्रादेशिक कार्यालयास एका उद्योजकाने एमआयडीसी प्रादेशिक कार्यालयाकडून आलेल्या पत्रानुसार इ-१ ते इ-४ या भूखंडाच्या पुनर्बांधणी करण्याकरिता

त्याच्याकडे असलेल्या कागदपत्राच्या दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास सादर केलेल्या नस्तीतील कागदपत्रे व नकाशे गहाळ झाल्याची तक्रार प्रादेशिक अधिकाऱ्यांनी सातापूर पोलीस स्टेशन, नाशिक येथे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) :(१) होय,

या प्रकरणी सातपुर पोलीस स्टेशनला प्राप्त तक्रारीवरुन वस्तु मिसींग रजिस्टर नं. ७५५/२०१६ दि.२८/१०/२०१६ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाचे सातपुरा मधील भुखंड क्र. ई-१ ते ई-४ चे कागदपत्र भुमापक श्री.बकरे यांच्या ताब्यात असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कार्यालयाची पुर्व परवानगी न घेता, स्वत: फायद्यासाठी अथवा कोणालातरी फायदा व्हावा या उद्देशाने कोठेतरी लपवून ठेवून सरकारी दस्तऐवजचा गैरवापर केल्याप्रकरणी सातपुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १२५/२०१७ भा.दं.वि. कलम ४०८, ४०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

शिफु सन-कृतीद्वारे तरुण-तरुणींची दिशाभूल करण्यात येत असल्याबाबत

(३५) ८९०४७ (०४-०९-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिफु सन-कृतीद्वारे १८ ते २५ वर्षे वयोगटातील तरुण-तरुणींना अश्लील मजकूर पाठवून तसेच लैंगिक भावना चाळविल्या जातील व त्यातून तरुण-तरुणींना व्याभिचारी मार्गाला लावून त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी मुंबई पोलीसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अशाप्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपायोजनात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर गुन्ह्यातील फिर्यादीच्या मुली तसेच, इतर १८ ते २५ वयोगटातील मुला-मुलींना आरोपीने निर्माण केलेल्या शिफु सन-कृती नावाच्या वेब पेज व्दारे इंटरनेटच्या

माध्यमातून अश्लिल साहित्य व स्त्री-पुरुष शारीरीक संबंध दर्शविणारे लेख व चित्रे दाखवून जाळ्यात ओढले. आरोपीने स्वत:ला सेक्रटरी जनरल ऑफ नॅशनल ह्युमन राईट कौन्सिल या पदावर असल्याचे, प्रविण गांधी लॉ कॉलेज, मुंबई येथे व्हिजीटिंग फॅकल्टी असल्याचे तसेच, मानोसोपचार तज्ञ व मेडीकल प्रक्टीशनर नसतांनाही तसे असल्याचे भासवून फसवणूक केली आहे.

यानुषंगाने मालाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६०/१७ भा.दं.वि. कलम २९२, ३२८, ३७०, ४२० सह कलम ६७, ६७ (अ) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पुढील तपासकामी कक्ष-९, गु.प्र.शा., गुन्हे अन्वेषण विभागाकडे गु.र.क्र. १६/१७ प्रमाणे वर्ग करण्यात आला आहे.

नमूद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वांद्रे बी.जे. रस्त्यावरील बॅन्डस्टॅण्ड , गणेश नगरात छेडछाडीचा जाब विचारल्याच्या रागातून एका कुटुंबातील दोन महिलांसह मुलीला पेटविल्याबाबत

(३६) ८९४१३ (०४-०९-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे बी.जे. रस्त्यावरील बॅन्डस्टॅण्ड, गणेश नगरात छेडछाडीचा जाब विचारल्याच्या रागातून तेथे राहणा-या एका कुटुंबातील दोन महिलांसह मुलीला पेट्रोल ओतून त्यांना पेटवून दिल्याची बाब दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार आरोपींवर गुन्हा दाखल करून दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपीविरुध्द बांद्रा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५६/२०१७, भा. दं. वि. कलम ३०७, ३२६(अ), ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय कर्मचा-यांची स्वतःच्या मालकीची सदनिका असतानाही शासकीय वसाहतीतील घरे रिक्त करीत नसल्याबाबत

(३७) ८९५७० (०४-०९-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कर्मचा-यांना राहण्याची व्यवस्था नसल्यास शासकीय वसाहतीत तात्पुरती राहण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही कर्मचा-यांनी गृहकर्ज घेवून स्वतःच्या मालकीच्या सदनिका घेतल्या असूनही त्यांनी शासकीय वसाहतीतील घर रिक्त केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे नव्याने कर्तव्यावर येणा-या कर्मचा-यांना शासकीय निवासस्थानात घर उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१७) :(१) नाही. तथापि बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचा-यास शासन सेवेत किंवा बृहन्मुंबई कार्यरत असेपर्यंत यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरीता शासकीय निवासस्थान वाटप करण्यात येते.

(२) बृहन्मुंबईतील कार्यालयात कार्यरत कर्मचा-यांना त्यांचे ग्रेड वेतन विचारात घेऊन अनुज्ञेय क्षेत्रफळाचे शासकीय निवासस्थान वाटप केले जाते. एखाद्या कर्मचा-याचे त्याला ग्रेड वेतनानुसार अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाचे स्वतःच्या मालकीचे घर असले तर त्याला शासकीय निवासस्थान अनुज्ञेय आहे. तथापि अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा स्वतःच्या मालकीचे मोठ्या क्षेत्रफळाचे घर असल्यास व सदर बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास सदर कर्मचा-यावर निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या सेवेतील आरक्षित पदांसाठी बिगर मागासवर्गीय उमेदवारांमधून नियुक्त्या करण्याचा घेण्यात आलेला निर्णय

(३८) ९०१०९ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अन्य घटकांसाठी राखीव ठेवलेल्या जागा बिगर मागासवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात येऊ नयेत अशी सन २००१ मध्ये केलेल्या आरक्षण कायद्याच्या कलम ४(२) मध्ये तरतूद करण्यात आलेली असताना त्याचे उल्लंघन करुन आरक्षित पदांसाठी मागासवर्गीयामधून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अशा जागा रिक्त न ठेवता त्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांमधून नियुक्त्या करुन भरण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अन्य घटकांसाठी शासकीय/निम शासकीय सेवांमध्ये घटनात्मक व कायदेशीर तरतुदींनुसार असलेले आरक्षण अबाधित न ठेवता त्यात शासन निर्णयाद्वारे बेकायदेशीरपणे बदल करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त शासन निर्णयानुसार शासकीय/निम शासकीय सेवांमध्ये असलेल्या घटनात्मक व कायदेशीर आरक्षणात शासन निर्णयाने बदल केल्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अन्य घटक यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित रहावे लागणार असल्यामुळे उक्त शासन निर्णय रद्द करुन आरक्षणाची तरतूद आबाधित ठेवण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१७) :(१) व (२) छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबत, सर्व मागासवर्गीयांना समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचे पालन करुन मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दि. ९ मे,२०१३ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन आरक्षण अधिनियम २००१ शी सुसंगत अशी कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि.२९ मे,२०१७ अन्वये विहित करण्यात आली आहे. त्यामध्ये ज्यावेळी बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होत नसेल, अशा वेळी प्रशासकीय दृष्टया कामकाज सुरळीत चालण्यासाठी सदर पद त्या विशिष्ट प्रवर्गासाठी तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करुन ते सेवाजेष्ठ उमेदवारांमधून (मागासवर्गीय /खुला) तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची तरतुद आहे.

(३) ज्यावेळी सर्व मागास प्रवर्गासाठी केवळ एकच पद उपलब्ध होते अशा वेळी सर्व मागास प्रवर्गांना प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने, आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ६(१) मधील तरतुदीनुसार बिंदुनामावलीच्या क्रमवारीनुसार पद अदलाबदलीने भरण्याबाबतची तरतुद मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार सदर शासन परिपत्रकामध्ये आहे. या तरतुदीनुसार सर्व मागास प्रवर्गांना समान संधी मिळणार असल्यामुळे अनुसूचित जाती - जमाती व अन्य घटक यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित रहावे लागणार नाही. त्यामुळे सदर शासन परिपत्रक रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ध्वनी प्रदुषण रोखण्यासाठी सक्षमपणे कारवाई करण्याबाबत

(३९) ९०१३० (०४-०९-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस ठाण्यात ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी ध्वनी मापन यंत्रे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पोलीस ठाण्यातून ध्वनी प्रदूषणाविरोधात अत्यल्प कारवाई होत असल्याची माहिती माहे एप्रिल-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात ११३६ ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रारी करुनही केवळ २७ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,राज्यात ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी सक्षमपणे कारवाई करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१७) :(१) होय हे खरे आहे,

(२) दि.०१.०१.२०१७ ते दि.३१.०३.२०१७ या कालावधीत राज्यात ध्वनी प्रदुषणा विरोधात ४६५१ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी २८६ तक्रारीमध्ये तथ्य आढळुन आल्याने ध्वनीप्रदुषण नियम २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा १९८६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) होय खरे आहे.

(४) ध्वनी प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यांवर होणा-या अनिष्ट परिणामांना आळा घालण्यासाठी ध्वनी प्रदुषण नियंत्रण नियम, २००० व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ याबाबत प्रभावीपणे अमलबजावणी करण्याकरीता सर्व पोलीस कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहे. ध्वनी प्रदुषणामुळे होणा-या परिणामांबाबत ध्वनी प्रदुषण कायद्यातील शिक्षेबाबत कायद्यातील तरतूदी बाबतची माहिती देण्यासाठी शाळा / महाविद्यालयांमध्ये चर्चा सत्र / व्याख्यान आयोजित करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. Anti Honking Drive प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरु करण्याबाबत तसेच वाहनांच्या हॉर्नमुळे ध्वनी प्रदुषण करणा-या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. टॅक्सी व रिक्षा युनियन तसेच खाजगी वाहनचालक यांच्यासोबत संयुक्त कार्य शाळा आयोजित करुन ध्वनी प्रदुषणाबाबत जागरुकता निर्माण करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. रात्रीच्या वेळेस रेस लावणा-या मोटार सायकल स्वारांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेतील शहरी पायाभूत सुविधा विकास योजनेंतर्गत (UIDSSMT) मल:निसरण व्यवस्था भूमिगत गटार अद्यावत करण्याच्या कामाबाबत

(४०) ९०६०४ (२३-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेला लहान व मध्यम शहरांसाठी शहरी पायाभूत सुविधा विकास योजनेंतर्गत (UIDSSMT) केंद्र शासनाकडून मल:निसरण व्यवस्था भूमिगत गटार अद्यावत करण्यासाठी निधी शासनाच्या हमीवर प्राप्त झाला व याबाबतची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांतर्गत शासनाकडे जो अहवाल सादर केला त्यामध्ये नाल्यावरील तिक्रमणे, एस.टी.पी. करिता जागा ई. त्रुटी लपवून ठेवून त्याचा उल्लेख प्रकल्प अहवालात नसल्याने त्यामुळे प्रकल्प अहवालानुसार या प्रकल्पाचे काम होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्ष काम सुरू करतेवेळी प्रकल्प अहवालाबाबत उच्च स्तरीय तांत्रिक विषयाच्या संस्थेमार्फत छाननी करण्यात आली होती काय,

(४) असल्यास, शासन निर्णयानुसार आशा प्रकल्पाचे तांत्रिकदृष्ट्या सक्षम संस्थेमार्फत लेखा परीक्षण होणे आवश्यक आहे तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम संस्थेमार्फत लेखा परीक्षण होणे आवश्यक असून या प्रकल्पाकरिता दोन्ही लेखापरीक्षण झाली आहेत काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

• केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत रु.३६५.६९ कोटीची औरंगाबाद शहर भूमिगत गटार योजना मंजूर आहे.

• सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासन हिश्याचा रु.२९२.५५ कोटी निधी महानगरपालिकेस वितरीत केला आहे.

• औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या हिश्यापैकी रु.१८.२८ कोटी निधी उभा केला आहे.

• अशा प्रकारे औरंगाबाद महानगरपालिकेकडे एकूण प्राप्त रु.३१०.८३ कोटी निधीपैकी रु.२४५.६७ कोटी खर्च झाला असून प्रकल्पाचे ७०% काम पूर्ण झाले आहे.

(२) प्रकल्पांतर्गत समाविष्ट कामांच्या प्रत्यक्ष स्थळांवर काम करतांना उपांगांच्या जागांमध्ये बदल झालेला आहे. तथापि, सदर बदल मंजूर रकमेच्या मर्यादेत असल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३), (४) व (५) • केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रकल्पाचा विस्तृत अहवाल केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटना (सीपीएचईईओ) यांच्याकडून तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, आय.आय.टी. मुंबई व मुंबई महानगपालिकेच्या वरीष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यांकडून तपासून घेण्यात आला आहे.

• प्रकल्पाच्या रेखाचित्रांस आय.आय.टी. मुंबई व रुरकी यांची मान्यता मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष कामास औरंगाबाद महानगपालिकेमार्फत करण्यात आली आहे.
• केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रकल्पासाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यात आला असून प्रकल्पाच्या कामांवर त्यांच्याकडून नियमित देखरेख व तपासणी करण्यात येते.
• प्रकल्पाचे तांत्रिक लेखापरिक्षण व तपासणी शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व ऑडीटरजनरल, नागपूर यांच्याकडून वेळोवेळी करण्यात येते.

स्वतंत्र्य सैनिकांच्या निवृत्ती वेतनाची प्रकरणे मार्गी लावण्याबाबत

(४१) ९०६१६ (१२-०९-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वतंत्र्य सैनिक म्हणून शासन दरबारी मानसन्मान मिळावा निवृत्ती वेतन मिळावे यासाठी बोगस कागदपत्रे सादर करण्याचे प्रकार मागील काही वर्षात वाढले असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकषात बसत नसल्याने सुमारे चार ते पाच हजार स्वतंत्र्य सैनिकांची निवृत्ती वेतनाची प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणांची पडताळणी करुन स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्ती वेतनाची प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१७) :(१) स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन मिळण्यासाठी अर्जदारांनी बोगस कागदपत्रे सादर केली असल्याचे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

शासन निर्णय दिनांक २०.०४.२०१७ अन्वये संबंधीत महसूली विभागाचे आयुक्त यांच्या स्तरावर तपासणी समिती नेमण्यात आली असून सदर समितीमार्फत स्वातंत्र्यसैनिक निवृत्तीवेतनाकरिता प्राप्त प्रस्तावांची छाननी करून शासनास अहवाल सादर केला जातो.
(२) शासन निर्णय दि. ४.०७.१९९५ नुसार (अ) तुरुंगवास झालेले स्वातंत्र्यसैनिक, (आ) पकड वॉरंट निघाल्यामुळे फरारी राहिलेले स्वातंत्र्य सैनिक, (इ) भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि (ई) गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेले स्वातंत्र्यसैनिक यांनी निवृत्तीवेतन मिळण्यासाठी कोणते पुरावे सादर करणे आवश्यक आहे, हे विहित करण्यात आलेले आहे.

या शासन निर्णयान्वये विहित निकषांची पूर्तता ज्या अर्जदारांच्या बाबतीत होत नाही अशा अर्जदारांचे अर्ज सन १९९६ पासून आतापर्यंतच्या कालावधीत नामंजूर करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

होमगार्डच्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात झालेला गैरप्रकार

(४२) ९१२३० (०४-०९-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होमगार्डच्या माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याबाबतची वरिष्ठ पातळीवरील सुरू असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले,

(३) तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०१७) :(१) हे खरे नाही, तथापि, होमगार्ड नोंदणीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अपर पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार माहे जुलै, २०१६ मध्ये झालेल्या भरती प्रक्रीयेत कोणताही गैरप्रकार झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई आणि ठाणे पोलिसांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंट वर प्राप्त होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाच्या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत

(४३) ९१२९३ (०४-०९-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि ठाणे पोलिसांचे अधिकृत ट्विटर अकाऊंट हे ध्वनीप्रदूषणाच्या तक्रारींसाठी प्रसिध्द असून या तक्रारींची दखल घेऊन त्यावर कारवाई केली जात असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ध्वनीप्रदूषणाबाबत पोलीस ठाण्यात तक्रारी केल्यास तक्रारीची शहानिशा करण्यासाठी पोलीस गेले असता पोलीस दिसताचक्षणी आवाज बंद केला जात असल्याचे निदर्शनास येते आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१७) :(१), (२) व (३) नागरीकांद्वारे ट्विटरवर ध्वनीप्रदुषणाची तक्रार प्राप्त होताच ती मुख्य नियंत्रण कक्षामार्फत संबंधीत पोलीस ठाण्यास कळविण्यात येते. ध्वनीक्षेपक चालू असल्याचे आढळुन आल्यास संबंधीत पोलीस ठाण्यामार्फत पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ व ध्वनी प्रदुषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतूदींच्या

अनुषंगाने कारवाई करण्यात येते. ध्वनी प्रदुषण नियमान्वये सन २०१६ मध्ये २३२ तसेच जानेवारी ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत ४५३ अशा एकुण ६८५ कारवाया करण्यात आल्या आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यास कार्यप्रणाली (S.O.P.) प्रमाणे कार्यवाही करण्यात येते. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशान्वये ध्वनी प्रदुषण नियमांची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय परिक्षेत्राकरीता ५ सनियंत्रण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे राबविण्यात येत असलेल्या अडचणी

(४४) ९१५७३ (०४-०९-२०१७). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम लोकप्रतिनिधी व अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे राबविण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर मोहिमेच्या बैठका, कार्यशाळा, घेण्यात येत नसुन पोलीस अधिकारीही याकडे लक्ष देत नाहित, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सक्षम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशाबाबत

(४५) ९१८२५ (२३-०८-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशात सुधारणा करून नवीन नियमांनुसार नागरी स्वराज्य संस्थांनी प्रस्ताव नगर परिषद संचालनालयाकडे सादर करण्यापूर्वी सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याकडून पूर्ण तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक केले असल्याचे माहे जून,२०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाची तांत्रिक मान्यता घेताना स्थानिक स्वराज्य संस्थांनी सक्षम प्राधिकाऱ्यास एकूण प्रकल्प खर्चाच्या १.५% रक्कम देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिती पाहता तांत्रिक मान्यता घेताना द्यावी लागणारी १.५% रक्कम भरणे शक्य नसल्याने सदर प्रस्तावास पूर्वीप्रमाणेच तांत्रिक सहमती घेऊन तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसाठी नगर परिषद संचालनालयाकडे सादर करण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जून, २०१७ वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांवरील १.५% रक्कम कमी करून त्यास दिलासा देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१७) :(१) महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानात प्रस्तावित प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे सादर करण्यापूर्वी सक्षम तांत्रिक प्राधिकरणाची पूर्व तांत्रिक मान्यता घेण्याचे दि.२४.५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रकल्पांच्या तांत्रिक मान्यतेसाठी प्रकल्प खर्चाच्या १ % रक्कम तांत्रिक तपासणी फी आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्रधिकरणाच्या धोरणात्मक निर्णयानुसार आकारण्यात येणारे तांत्रिक मान्यता शुल्क संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने अदा करणे क्रमप्राप्त आहे.

गोरेगाव (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या ठिकाणी गूढीपाडव्याच्या दिवशी गैरकानूनी मांस विक्री झाल्याबाबत

(४६) ९२२९४ (०४-०९-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (ता.सेनगाव, जि.हिंगोली) या ठिकाणी गूढीपाडव्याच्या दिवशी गैरकानूनी मांस विक्री झाल्यामुळे तेथील समाज बांधवाच्या भावना दुखावल्या असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा गंभीर प्रश्नाबाबत पोलीस प्रशासनाने जाणीवपूर्वक दूर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१०-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) गुढीपाडव्याच्या दिवसी गैरकानुनी मांस विक्री बाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील कांदिवली येथे ठाकूर कॉम्प्लेक्स भागात विशाल बनकर यांचे अपघातात झालेले निधन

(४७) ९२४५० (०४-०९-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदिवली येथे ठाकूर कॉम्प्लेक्स भागात दिनांक १० मार्च ,२०१७ रोजी वा त्यासुमारास विशाल बनकर यांच्या मोटारसायकलला पाठीमागून एका मोटरकारने धडक दिल्याने त्यांचे निधन झाल्याप्रकरणी समतानगर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अद्यापही एकाही आरोपीला अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी आरोपीला अटक केली असल्यास त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-१०-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुंबई उपनगरातील कांदिवली येथील ठाकूर कॉम्प्लेक्स भागात विशाल बनकर यांच्या मोटारसायकलला पाठीमागून एका मोटरकारने धडक दिल्याने झालेल्या मृत्यू बाबत समतानगर पोलीस ठाणे येथे अपमृत्यू नोंद क्र. ३५/१७ सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर घटना स्थळावरील सी.सी. टी.व्ही. फुटेजची तपासणी केली असता एका पांढऱ्या रंगाच्या अनोळखी मोटारकार चालकाने धडक देऊन त्याच्या ताब्यातील मोटारकार निष्काळजीपणे, भरधाव वेगाने चालवून मयत याच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याने व सदर ठिकाणावरुन पळून गेल्याने अज्ञात आरोपीविरुध्द समतानगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १११/१७ भा.दं.वि. कलम २७९, ३०४ (अ) सह कलम १३४ (अ) (ब), १८४ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील गाडीच्या प्राप्त सिरीजवरुन ताडदेव आर.टी.ओ. कार्यालयामध्ये नोंद असलेल्या गाड्यांची यादी मागविण्यात आली असून सदर यादीमधील गाडी क्रमांकाचे मालकाचा शोध घेवून त्याच्याकडे गुन्ह्याबाबत तपास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील बहुतांशी शासकीय कार्यालयांत कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४८) ९२४७३ (०४-०९-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर तालुक्यातील बहुतांशी शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचा-यांची कमतरता असल्याने नागरिकांच्या कामांमध्ये अत्यंत दिरंगाई व अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही तालुक्यांतील रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१७) :(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर या तालुक्यांतील शासकीय कार्यालयांमध्ये काही प्रमाणात पदे रिक्त आहेत. मात्र या कार्यालयांतील उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून अतिरिक्त वेळेत दैनंदिन कामकाजाचा निपटारा करण्यात येतो.

(२) उक्त दोन्ही तालुक्यांमधील शासकीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार/ कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, वर्धा तसेच संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मागण्याबाबत

(४९) ९३०४७ (०४-०९-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी आपल्या मागण्यासाठी दिनांक १२ ते १४ जुलै, २०१७ या कालावधीत संपावर जाण्याचा इशारा शासनाला माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या मागण्यांचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, त्यासंबंधात शासनाची भूमिका काय आहे व त्यानुसार सदरहू मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१७) :(१) होय.
(२) व (३) राज्यातील, शासकीय,निमशासकीय कर्मचारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी, शिक्षक यांच्या विविध मागण्यांचा समावेश होता. रास्त स्वरुपातील मागण्या शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परांडा (जि.उस्मानाबाद) विधानसभा मतदार संघातील अवैध धंद्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

(५०) ९३२६० (०४-०९-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा विधानसभा मतदार संघामध्ये (जि.उस्मानाबाद) पोलीस प्रशासनाच्या हेतूपुरस्सर दुर्लक्षामुळे अवैध धंदे मोठ्या प्रमाणावर चालु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवैध धंद्याच्या दुष्परिणामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न वारंवार निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व पोलीस अधिक्षक उस्मानाबाद यांना माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान तसेच वारंवार लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरील अवैध धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-११-२०१७) :(१) व (२) खरे नाही.
(३), (४) व (५) होय.

मा.लोकप्रतिनिधींच्या अर्जाची चौकशी करण्यात आलेली आहे. परांडा मतदार संघातील अवैध धंद्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने या धंद्यांवर कारवाई करुन निष्पन्न आरोपींविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.
त्याबाबतची माहीती खालीलप्रमाणे आहे.
अ)

क्र.	प्रकार	केसेस	आरोपी	जप्तमाल
०१	मुंबई दारुबंदी कायदा	१८१	१८६	१२,२९,२९१/-
०२	मुंबई जुगार कायदा	३१	३२	७८,६४५/-

ब)

क्र.	प्रकार	केसेस	आरोपी
०१	कलम १०७ दंप्रसं. प्रमाणे	४४७	९९६

०२	कलम १०९ दंप्रसं. प्रमाणे	९	९
०३	कलम ११० दंप्रसं. प्रमाणे	१६	२५
०४	कलम ९३ मुंबई दारुबंदी कायदा	१७	१७
०५	कलम १२२	०३	०३
०६	कलम १४४ दंप्रसं	१७	१७

क)

क्र.	प्रकार	केसेस	आरोपी
०१	अवैध प्रवाशी वाहतुक	२८	१९,०००
०२	मोटार वाहन कायद्याचे इतर कलमा प्रमाणे	११५०	८८,१८४

(६) विलंब झालेला नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.